श्री शिवाजी शिक्षण संस्थाव्दारा संचालीत

## डॉ.पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट, अमरावती

# वसतिगृह नियमावली

१) दरमहा १० तारखेच्या आत वसतिगृह शुल्क न भरल्यास प्रति दिवस रू.५० दंड भरावा लागेल.

२) शुल्क भरण्यासाठी महाविद्यालयाची (pay in slip) वापरावी. (pay in slip) बँकेत जमा करून त्याची प्रत महाविद्यालयाचे लेखा विभागात जमा करावी.

३) प्राचार्यांची परवानगी नसतांना सतत १५ दिवस गैरहजर असल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

४) वसतिगृहात हजेरी करिता हजेरी रजिस्टर मध्ये सह्या करणे व बायोमॅट्रीक पंच करणे अनिवार्य आहे.

५) वसतिगृहाचे नियमानूसारच बाहेर जाता व परत येता येईल व विद्यार्थीनीने (in-out register) रजिस्टर मध्ये नोंद करणे अनिवार्य आहे.

६) वसतिगृह रोज सायंकाळी ७.३० वाजता बंद होईल त्यानंतर कोणालाही प्रवेश नाही

७) रात्री बाहेर फिरण्यासाठी परवानगी नाही

८) वसतिगृहात रॅगींग करणे, मोठ्याने गप्पा मारणे, किंचाळणे, गाणे वाजवणे, व्हरांड्यात फिरणे, गोंधळ करणे, असभ्यपणे वागणे, ड्रग्स अलकोहोल वापरणे सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास सक्त दंडात्मक कार्यवाहि होईल व वसतिगृहातील प्रवेश रद्द केला जाईल.

९) टेरिसवर जाण्यास मनाई आहे.

१०) विद्यार्थीनीनी स्वतःच्या जबाबदारीवर रुममधील वस्तु / पैसे सुरक्षीत ठेवावे. रुममधून महत्वाचे वस्तु / पैसे चोरी किंवा गहाळ झाल्यास महाविद्यालयाची जबाबदारी माही.

११) विद्यार्थीनीने रुममध्ये वैयक्तिक टि.व्हि, गिझर, इंडक्शन, प्रेस, इमर्शन रॉड व इतर इलेक्ट्रीक साहित्य आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१२) रुममध्ये वैयक्तिक टि.व्हि, गिझर, इंडक्शन, प्रेस, इमर्शन रॉड व इतर इलेक्ट्रीक साहित्य आढळून आल्यास रूपये.१०००/– दंड भरावा लागेल व साहित्य जप्त केले जाईल.

१३) रुम मधील फॅन, लाईट, स्विच बोर्ड, इलेक्ट्रिक बटन व इतर साहित्य काळजी पुर्वक हाताळावेत व काम नसतांना बंद करावेत.

१४) महाविद्यालयाकडून रुम करिता ट्यूब लाईट / बल्ब साहित्य एकदाच उपलब्ध करून दिले जाईल

१५) पाण्याचा वापर मोजकाच करावा, पाणी वाया घालू नये, काम नसतांना नळ बंद करावेत

१६) सॅनेटरी नॅपकिन साठी नॅपकिन मशिनचा वापर करणे अनिवार्य आहे.

१७) ड्रेनेज लाईन मध्ये कचरा, प्लास्टीक, नॅपकिन व इतर वस्तू फेकणे मनाई आहे. ड्रेनेज लाईन बंद पडल्यास दंड आकारण्यात येईल.

१८) रूम मधील सामान व्यवस्थित व सुरक्षित ठेवणे, रुम स्वच्छ ठेवणे जबाबदारी विद्यार्थीनीची आहे. कचरा कचरापेटीतच टाकावा परिसरात इकडे तिकडे फेकू नये.

१९) रुममध्ये भिंतीवर ड्रॉईंग /पेन्टींग काढणे, पेन / पेंसीलने लिहणे मनाई आहे.

२०) रुममध्ये जेवण करणे मनाई आहे वेळेतच डायनिंग रूममध्ये जेवण करावे.

२१) रुम मधील टेबल खुर्च्या साहित्याची तोडफोड झाल्यास किंवा खराब झाल्यास नुकसान भरपाई द्यावी लागेल.

२२) रुमला वैयक्तिक कुलूप लावू नये. महाविद्यालयाकडून एक कुलूप व चाबी दिली जाईल. चाबी गहाळ केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागेल.

२३) व्हॅकेशन वर जाण्यापुर्वी प्रलंबित वसतिगृह शुल्क भरावे लागेल व प्राचार्यांची परवानगी आवश्यक आहे.

२४) विद्यार्थीनीला शारिरिक इजा अथवा आजारी पडल्यास वार्डन यांना ताबडतोब कळवावे.

२५) विद्यार्थीनी शिवाय पालक, नातेवाईक, मित्र –मैत्रीणी व अतिथी कोणालाही रूम मध्ये प्रवेश नाही

२६) नातेवाईकांनी वारंवार भेटण्यास येवू नये आठवड्यातून फक्त एकदा (रविवार) चे दिवशी भेटता येईल. नातेवाईकांनी गेस्ट रूममध्ये विद्यार्थीनीला भेटावे व व्हिजीटिंग रजिस्टर मध्ये नोंद केल्याशिवाय भेटता येणार नाही.

२७) वसतिगृहाचे आवारात मुला मुलींना मित्र –मैत्रीणी कोणालाही भेटण्यास सक्त मनाई आहे

२८) वसतिगृह सोडायचे असल्यास लेखी अर्ज लिहून वार्डन मार्फत अर्ज प्राचार्यांचे परवानगीसाठी सादर करावा

२९) वसतिगृहात रॅगिंग व शोषण सारख्या घटना घडल्यास महाविद्यालयाचे विशाखा कमिटीकडे ताबडतोब लेखी अर्ज करावा.

३०) वसतिगृहात एक वर्ष पुर्ण न झाल्यास व वसतिगृह सोडत असल्यास कुठलीही फि/डिपॉझिट रिफन्ड मिळणार नाही

३१) वसतिगृहाचे नियम न पाळल्यास प्रवेश रद्द होईल व शुल्क / डिपॉझिट रिफन्ड मिळणार नाही.

20/05/22

प्राचार्य
डॉ पं.दे.न.इ.अमरावती

Principal
Dr.P.D.N.I.Amravati